नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २३६ Issue - 236 | वार रविवार दि. १२ जानेवारी २०२५ Blow- Sunday Date 12 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...



### समुद्री घोड्यांच्या संवर्धन, प्रजनन प्रकल्पासाठी सिंधुदुर्गची निवड

सावंतवाडी : सिंधुदुर्गच्या समुद्रात समुद्री घोड्यांच्या अधिवासाबरोबरच त्यासाठीची पोषक परिस्थिती असल्याने या ठिकाणी समुद्री घोड्यांसाठी संवर्धन, प्रजनन केंद्राची निर्मिती करण्यात येणार आहे. समुद्री घोड्यांची संख्या वाढवून त्यांच्यासाठी आवश्यक असणाऱ्या अधिवासाच्या निर्मितीसाठी 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' ने (बीएनएचएस) वनविभागाच्या 'कांदळवन प्रतिष्ठान'ने पुढाकार घेतला असून, जिल्ह्यातील आचरा किंवा मिठमुंबरी या भागात संवर्धन, प्रजनन केंद्र उभारण्याचे 'बीएनएचएस'ने ठरविले आहे. समुद्री घोड्यांच्या संख्येला आणि अधिवासाला असलेला धोका लक्षात घेऊन 'बीएनएचएस'ने सिंधुदुर्गमध्ये समुद्री घोड्यांसाठी संवर्धन, प्रजनन प्रकल्प तयार करण्याचे ठरविले आहे. हा प्रकल्प सात कोटी रुपयांचा असून, या माध्यमातून समुद्री घोड्यांचे प्रजनन आणि त्यांच्यासाठी आवश्यक असणाऱ्या अधिवासाची निर्मिती करण्यात येणार आहे.

### इंग्लंड विरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची निवड

नवी दिल्ली : भारत आणि इंग्लंड यांच्या येत्या २२ जानेवारीपासून पाच सामन्यांची टी-२० मालिका सुरू होणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची निवड झाली असून, यामध्ये वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने पुनरागमन केले आहे. इंग्लंड विरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी निवड करण्यात आलेल्या या १५ सदस्सीय संघात सहा फलंदाज, सात गोलंदाज आणि दोन अष्टपैलू खेळाडूंचा समावेश आहे. या मालिकेतील सामने अनुक्रमे कोलकाता, चेन्नई, राजकोट, पुणे आणि मुंबई येथे होणार आहेत.


# देशमुख हत्या प्रकरणातील सर्व आरोपींवर मकोका

## संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी मकोका कायद्याखाली गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीड : बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सर्व आरोपींवर आता मकोका लावण्यात आल्याची घोषणा करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबतचे सुतोवाच काही दिवसंपूर्वीच केले होते. संघटित गुन्हेगारीच्या माध्यमातून दहशत निर्माण केल्याच्या पार्श्वभूमीवर या कायद्याअंतर्गत आता कारवाई होणार आहे. आरोपी प्रतीक घुले, सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे, सुधीर सांगळे, जयराम चाटे आणि महेश केदार यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. तर हत्या प्रकरणात सिद्धार्थ सोनवणेलाही आरोपी करण्यात आले आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरण गेल्या महिन्यापासून चर्चेत आहे. ९ डिसेंबरला बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली. संतोष देशमुख यांना अत्यंत क्रूर पद्धतीने ठार




करण्यात आले होते. या प्रकरणी आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे यासाठी भाजपा आमदार सुरेश धस यांच्यासह बीडमधील लोकप्रतिनिधी आवाज उठवत होते.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडवर सर्व विरोधक आरोप करत आहेत. मात्र त्याच्यावर फक्त खंडणीचा गुन्हा दाखल झालेला आहे. त्यामुळे त्याला मकोकाच्या बाहेर ठेवले गेले आहे. तसेच कृष्णा आंधळे हा आरोपीही अद्याप फरार असून त्याला अटक करण्यात पोलिसांना यश आलेले नाही.

संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी मकोका कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात येतो. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपींवर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल होते. सरकारी वकिलांनीही ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर सर्व आरोपींवर मकोका लावण्यात आला आहे. मकोका लागल्यानंतर आमदार सुरेश धस म्हणाले की, यात काहीही नवीन नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहातच याची घोषणा केली होती, त्याप्रमाणे मकोका लावला गेला आहे.

# केंद्राकडून महाराष्ट्राला १०,९३० कोटी; उत्तर प्रदेश, बिहारला अधिक निधी दिल्यावरून टीका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विविध कर रूपाने गोळा होणाऱ्या महसुलातून राज्यांना निधीचे वाटप करताना जानेवारी महिन्यात महाराष्ट्राच्या वाट्याला १० हजार ९३० कोटी आले आहेत. उत्तर प्रदेशला ३१ हजार कोटी तर बिहारला १७ हजार कोटींचे वाटप करण्यात आल्याबद्दल कर्नाटकातील काँग्रेस नेत्यांनी टीका केली आहे.



वस्तू आणि सेवा कर तसेच विविध कर रूपाने गोळा होणाऱ्या महसुलातून राज्यांना १५व्या वित्त आयोगाच्या शिफारसीवरून ४१ टक्के रक्कम दिली जाते. ४१ टक्के रक्कम देण्याची तरतूद असली तरी प्रत्यक्षात ३३ टक्केच रक्कम मिळते, असा आरोप तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनि मागे केला होता. जानेवारी महिन्यासाठी केंद्र सरकारने राज्यांना १ लाख ७३ हजार कोटींची रक्कम हस्तांतरित केली आहे. डिसेंबरमध्ये ८९ हजार कोटी रक्कम देण्यात आली होती. विविध विकास प्रकल्प राबविण्यासाठी केंद्राने यंदा राज्यांना देण्यात येणाऱ्या रक्कमेत वाढ केल्याची माहिती केंद्र सरकारच्या प्रवक्त्याने दिली. यंदा महाराष्ट्राच्या वाट्याला १०,९३० कोटी रुपये आले आहेत. याआधी ऑक्टोबर महिन्याता राज्याच्या वाट्याला ११ हजार २५५ कोटी रुपये आले होते. २०२३-२४ या आर्थिक वर्षात केंद्राकडून राज्याला कर महसुलातून ६९,७७० कोटी रुपये मिळाले होते. चालू आर्थिक वर्षात या रक्कमेत वाढ होण्याची चिन्हे आहेत.

जानेवारी महिन्यासाठी केंद्राने निधीचे वाटप करताना उत्तर प्रदेशला सर्वाधिक ३१ हजार कोटी दिले आहेत. बिहार (१७,४०३ कोटी), मध्य प्रदेश (१३,५८२ कोटी), पश्चिम बंगाल (१३ हजार कोटी) या चार राज्यांना अधिक निधी देण्यात आला आहे. उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेशला अधिक निधी देताना नेहमीप्रमाणे कर्नाटकवर अन्याय करण्यात आल्याचा आरोप काँग्रेसचे माजी खासदार डी. के. सुरेश यांनी केला आहे. कर्नाटकच्या वाट्याला ६३१० कोटी रुपये आले आहेत. कर रुपाने जमा होणाऱ्या महसुलातून राज्यांना निधी देण्याचे सूत्र निश्चित करण्यात आले आहे. यानुसाच निधीचे वाटप केले जाते, असे वित्त विभागाने स्पष्टीकरण दिले आहे.

# संयमी भूमिका फळली! भाजपच्या कार्यकारी प्रदेशाध्यक्षपदी रविंद्र चव्हाणांची नियुक्ती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय जनता पार्टीचे आमदार रविंद्र चव्हाण यांची भाजपच्या प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. भाजपचे राष्ट्रीय जे पी नड्डा यांनी तात्काळ प्रभावाने नियुक्ती केली आहे. भाजपचे विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याजागी आता चव्हाण प्रदेश कार्यकारी अध्यक्ष म्हणून काम पाहणार आहेत.

या क्षणापासून आता रविंद्र चव्हाण भाजप पक्षाचा कारभार हाकणार आहेत. महायुतीच्या नव्या मंत्रीमंडळात चव्हाणांना स्थान मिळाले नाही. त्यानंतर त्यांनी नाराजी न व्यक्त पक्ष जो आदेश देणार त्याचे पालन करणार असल्याचे स्पष्ट केले होते. त्यानंतर त्यांना पक्षसंघटनेत मोठे पद मिळणार असल्याच्या चर्चा होत्या. यावर आता शिक्कामोर्तब झाला आहे.

रविंद्र चव्हाण हे डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. सलग चौथ्यांदा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करत आहेत. महायुतीच्या मागील मंत्रिमंडळात त्यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून काम पाहिले. परंतु यंदा त्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळू शकलेले नाही. दरम्यान, भाजपचे विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे आता मंत्रीपदाची धुरा असल्याने त्यांना राजीनामा द्यावा लागणार आहे. त्यानंतर आता पक्षसंघटनेची सूत्र आता रविंद्र चव्हाणांच्या हाती असणार आहेत.

# मुंबई विमानतळावर सोने, चरस, गांजा जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर गुरुवार आणि शुक्रवारी केलेल्या दोन वेगवेगळ्या कारवाईत १.२५७ किलो सोने आणि ३० किलो चरस जप्त केले. रस अल - खैमाह येथून सोने आणि बँकॉकहून चरस, गांजाची तस्करी करण्यात आली होती. या प्रकरणी सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी सहा प्रवाशांना अटक केली. जप्त करण्यात आलेल्या सोन्याची किंमत सुमारे ९१ लाख रुपये, तर चरस आणि गांजाची किंमत अनुक्रमे ३० कोटी रुपये आणि ११ कोटी रुपये आहे.

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावर रस अल - खैमाह येथून आलेल्या एका प्रवाशाला सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी अडवले. या प्रवाशाची तपासणी केली असता त्यांच्याकडे मेणात दडवलेली २४ कॅरट सोन्याची भुकटी आणि २४ कॅरट सोन्याच्या १.२५७ किलोग्रॅम वजनाच्या साखळ्या सापडल्या. त्यांची किंमत सुमारे ९१ लाख रुपये आहे. प्रवाशाने हे सोने मोजे आणि बूटांमध्ये लपवले होते. याप्रकरणी एका प्रवाशाला अटक करण्यात आली. बँकॉक येथून आलेल्या तीन प्रवाशांना सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी विमानतळावर अडवले आणि त्यांची तपासणी केली. या प्रवाशांकडून ११ किलो गांजा जप्त करण्यात आला असून त्याची किंमत सुमारे ११ कोटी रुपये आहे. प्लॅस्टिकच्या वेष्टनात लपवलेले हे अंमली पदार्थ ट्रॉली बॅगमध्ये सापडले. याप्रकरणी सदर प्रवाशाला अटक करण्यात आली. तसेच बँकॉक येथून आलेल्या आणखी दोन प्रवाशांची सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी तपासणी केली असता त्यांच्याकडे १८ किलो चरस सापडले. जप्त केलेल्या चरसची किंमत सुमारे १८ कोटी रुपये आहे. सदर दोन प्रवाशांना अटक करण्यात आली.

**मुख्य आरोपीच्या बंगळुरूमधून मुसक्या आवळल्या** | **कोलकाता पोलिसांनी केली कारवाई**

# 'डिजिटल अरेस्ट' स्कॅमद्वारे देशभरात हजारो कोटींची लूट करणाऱ्या मास्टरमाईंडला अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : 'डिजिटल अरेस्ट' म्हणजेच डिजिटल अटक हा घोटाळा गेल्या काही काळापासून भारतीय नागरिकांची डोकेदुखी ठरत आहे. सीबीआय, सीआयडी, ईडी किंवा पोलीस विभागाकडून बोलत असल्याचे भासवून असंख्य नागरिक या घोटाळ्याला बळी पडले आहेत. दोन किंवा काहींना तीन-तीन दिवस डिजिटल अटकेत ठेवून त्यांचे शोषण करण्यात आले. मालमत्ता विकण्यास भाग पाडून, काहींची संपूर्ण बचत हडप करून घोटाळेबाजांनी देशभरात उच्छाद मांडला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या घोटाळ्याला बळी पडू नका, असे आवाहन केले होते. अखेर कोलकाता पोलिसांनी या घोटाळ्यातील एका मुख्य आरोपीच्या बंगळुरूमधून मुसक्या आवळ्याचे सांगण्यात येत आहे.

कोलकाता पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चिराग कपूर नामक आरोपीला अटक करण्यात आली आहे. हा या घोटाळ्यातील एक प्रमुख मास्टरमाईंड असल्याचे पोलिसांनी सांगितले. कपूर ९३० प्रकरणांत आरोपी असल्याचे सांगितले जात आहे. कोलकाता येथील देबश्री दत्ता यांची ४७ लाख रुपयांची फसवणूक झाली होती. त्यांच्या नावाचा गैरवापर करून एक पार्सल पाठवले गेले आहे आणि त्यात अमली पदार्थ आढळ्याचा बनाव एका कथित अधिकाऱ्याने व्हिडीओ कॉलद्वारे केला होता. कायदेशीर कारवाईची धमकी देऊन घोटाळेबाजांनी दत्ता यांची ४७ लाखांची फसवणूक केली. या प्रकरणाचा शोध घेत असताना कोलकाता पोलीस आरोपीपर्यंत पोहोचले.

कोलकाता पोलिसांनी बंगळुरूमधून ११ जणांना ताब्यात घेतले आहे. त्यापैकी चिराग कपूर हाही एक आहे. तो चिंतक राज या नावाने बंगळुरूच्या जेपी नगर भागात राहत होता. स्वतःला सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणवणारा कपूर मागच्या सात महिन्यांपासून हे रॅकेट चालवत होता.



बंगळुरुमध्ये कारवाई करणाऱ्या पोलिसांनी सांगितले की, आम्ही पहाटे ४.३० वाजता कपूरच्या घरावर धाड टाकून त्यांना ताब्यात घेतले. आरोपीने स्वतःला सॉफ्टवेअर इंजिनिअर असल्याचे सांगितले. मात्र आम्ही त्याच्या दाव्याची सत्यता तपासत आहोत. धाड टाकलेल्या घरातून काही उपकरणे जप्त करण्यात आलेली असून त्याची न्यायवैद्यक प्रयोगशाळेत तपासणी केली जाणार आहे.

सायबर गुन्हेगार नवनवीन युक्ती काढून अनेकांची लुबाडणूक करतात. ती करण्यासाठीच 'डिजिटल अरेस्ट' नावाची युक्ती गुन्हेगार वापरत आहेत. या गुन्हेगारांची टोळी पीडितांना पोलीस, ईडी, सीबीआय, प्राप्तिकर विभाग, लष्करी अधिकारी असल्याची बतावणी करतात. देशविघातक कृत्य, बेकायदेशीर वस्तू, ड्रग्ज, बनावट पासपोर्ट, दहशतवाद्यांशी आर्थिक व्यवहार केल्याचे सांगून 'डिजिटल अरेस्ट' केल्याचे सांगतात. यात पीडित व्यक्तीला २४ तासांपर्यंत त्याच्याच घरात व्हिडीओ कॉलवर बंदिस्त राहायला सांगितले जाते. सायबर गुन्हेगार व्हिडीओ कॉलवर कुठल्या तरी पोलीस स्टेशन किंवा सीबीआयसारख्या एजन्सीच्या कार्यालयातून बोलत असल्याचे भासवतात. त्यामुळे पीडित व्यक्तीचा विश्वास बसतो. पीडित व्यक्ती खरेच तिला 'डिजिटल अरेस्ट' झाल्याचे मानू लागते. यादरम्यान, सायबर गुन्हेगार त्यांना खंडणीची मागणी करतो. पैसे न दिल्यास प्रत्यक्षात अटक करण्याची भीती दाखवतो. त्यामुळे अनेक जण सायबर गुन्हेगारांच्या नव्या शक्कलेला बळी पडतात आणि लाखो रुपये त्यांच्या घशात घालतात.

# उत्तरप्रदेशातील कन्नोज रेल्वे स्थानकावर भीषण दुर्घटना; अनेक कामगार ढिगाऱ्याखाली अडकले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कन्नौज : उत्तरप्रदेशातील कन्नौज रेल्वे स्थानकावरील बांधकाम सुरु असलेली इमारत कोसळल्याने अनेक कामगार बांधकामाच्या ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. तेथील अनेक कामगारांना ढिगाऱ्यातून बाहेर काढण्यासाठी बचाव कार्य वेगाने सुरू आहे. आतापर्यंत २३ जखमी कामगारांना जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एसडीआरएफची टीमही तेथे पोहचली आहे. कन्नौज रेल्वे स्थानकावर अमृत भारत स्टेशन योजने अंतर्गत काम सुरु होते.



उत्तर प्रदेशचे मंत्री असीम अरुण यांनी २३ कामगारांना वाचवण्यात आल्याची पुष्टी केली, ज्यामध्ये २० जणांना किरकोळ दुखापत झाली आहे आणि तीन जण गंभीर जखमी आहेत. इतर लोक अडकल्याची भीती असल्याने बचाव कार्य सुरूच असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

कन्नौज रेल्वे स्थानकावरील अपघाताबाबत मंत्री असीम अरुण यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, कन्नौज रेल्वे स्थानकावर बांधकाम सुरू आहे. बांधकाम सुरू असलेल्या इमारतीवर कामगार काम करत होते. त्याठिकाणी जास्त काँक्रीट टाकल्यामुळे लिंटेल कोसळले.या अपघातामध्ये एकूण २३ जण जखमी झाले आहेत.ज्यांच्यावर कन्नौजच्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.ढिगाऱ्याखाली आणखी काही लोक अडकले असण्याची शक्यता आहे. ढिगारा काढण्यासाठी मशीनचाही वापर केला जात आहे.हा अपघात रेल्वेशी संबंधित असल्याने याची चौकशी केली जाईल.या प्रकरणामध्ये जो कोणी दोषी आढळेल त्याला निश्चितच शिक्षा सुनावण्यात येईल. या दुर्घटनेमध्ये जखमी झालेल्यांवर सरकारकडून मोफत उपचार केले जात आहेत.

**मुख्यमंत्री योगी यांनी दिले महत्वाचे निर्देश**

जखमी कामगारांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. स्थानिक पोलिस दलासह एसडीआरएफची एक टीमही घटनास्थळी रवाना करण्यात आली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले की, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अपघाताची दखल घेतली आहे. मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना तातडीने घटनास्थळी पोहोचून मदतकार्याला गती देण्याचे आणि जखमींना योग्य उपचार देण्याचे निर्देश दिले आहेत.

# मराठी विचारभाषा भ्रम : मत साहित्याचे राजकारण

मराठी माणूस भाषे शिवाय सर्व गोष्टीवर जास्त प्रेम करतो. त्याचे प्रेम भावनेवर जास्त असते .भौतिक व्यवस्थेचीदक्षता घेणे. त्यात हित संबंध शोधणे .हे मराठी माणसाचे कायम वर्तनाची खुळ राहिले आहे .सतत व्यवस्थेत कुठेच आधार नाही त्यामुळे व्यवस्था आपल्या हितसंबंधासाठी प्राप्त होईल काय? असा विचार करणारा मराठी माणूस निर्माणच्या कार्यात नेहमी मागे आढळून येतो.

भाषेचा विचार आणि मराठी माणसाचा विचार या दोन गोष्टी पूर्णतः वेगळे आहेत. मराठी माणसाला विचारा पेक्षा मन हे श्रेष्ठ वाटते. प्रतिक्रिया त्याहून श्रेष्ठ वाटते. जोपासलेले अहंकार हे सतत जपण्यात ही महत्त्व वाटते आणि त्यामुळे मराठी माणसाचा विचार हा सुसंबंध पणे विकसित सर्व कालखंडात पुढे आलेला आढळून येत नाही. मराठी माणूस मतवादी आणि कृतीवादी या दोन गटात विभागलेला आहे मतवादी माणसांच्या इथे भरणा आहे. इथे त्यांची गर्दी आहे. कृतीवादी माणसांना या गर्दीतून हाकलण्याचे सर्व कालखंडात साहित्याच्या व्यवहारात प्रयत्न झाले आहेत.

मतवादी माणसांचा भाषा व्यवहार हा वाक्य संरचना आणि विशेषतः गद्यात्मक विकसनाकडे न जाता मराठी माणूस पद्यालाच (काव्यालाच)साहित्य समजत पुढे आला आहे. मराठी माणसाचे मत आणि कृती यांचे एकमत वर्तनात झालेले आभावाने आढळून येते.

संस्कृत उत्तर कालखंडात मराठी भाषेला विचार भाषेचे स्वरूप देण्याचे अपवादात्मक प्रयत्न झाले, पण आजही मराठी भाषा विचार भाषा होऊ शकली नाही .हे वास्तव आहे मराठी भाषेला विचार भाषा बनवण्यासाठी कृती साहित्यिकांची चळवळीचे सुरू झाले नाही. मतसाहित्यिक आणि कृती साहित्यिक यांचा फरक न समजणारा मराठी वाचक इथे मोठ्या प्रमाणात आहेत मतसाहित्यिकांना साहित्यिक राजकरण करणे सोपे जाते. संस्था ताब्यात ठेवणे आणि तेच साहित्य म्हणून भाषिकांच्या माथी मारणे हे इथे चालू आहे.

मतसाहित्यिकांचा बुद्धी विकास आणि वासनांचा संघर्ष साहित्याच्या व्यवहारात सुव्यवस्थित प्रतिबंधित झालेला नाही प्रज्ञावंत होण्यासाठी मतसाहित्यिकांचा प्रयत्नही आढळून येत नाही प्रज्ञा मयता आणि प्रज्ञावंत हे साहित्याला प्रतिभेच्या आधारे पुढील अविष्कार प्राप्त होणे आवश्यक आहे ,पण मराठी भाषेत प्रतिभावंतांची साहित्यकृती ही भावनेच्या कल्पनेच्या आधारे साहित्यात साकारते असे साहित्य कल्पना आधारित फॅंटसीचे साहित्य खूप पुढे आले आहे पण प्रज्ञा मयता आणि प्रज्ञावंतता ही साहित्याच्या सर्व व्यवहारात पदोपदी दिसून येत नाही ,आणि त्यामुळे मराठी साहित्य बुद्धी आणि विकार बुद्धी आणि भावना बुद्ध यांनी वासना यांच्या द्वंद्वातून अडखळलेले दिसते मराठी साहित्याला या सर्व विकार वासनांच्या नोंदवातून निखळपणे प्रज्ञा मयतेच्या प्रवासाकडे जावे लागेल आजही हे साहित्य क्रिया प्रतिक्रिया सांस्कृतिकता रुढी वाद आणि साहित्यातील प ध्यात्मक प्रभाव हा जास्त असल्याने मराठी साहित्यात प्रज्ञा मयता आणि प्रज्ञावंत हे दोन प्रभाव विकसित होत असलेले दिसून येत नाही. प - ध्यात्मकतेलाच साहित्य मांनण्याची सक्ती इथे केली जाते आहे .त्यामुळे मराठी साहित्य हे विचार साहित्य विकसित होण्यापासून पेशवाई उत्तर कालखंडामध्ये यशस्वी झाले नाही पेशवे पूर्व कालखंडातील भाषा ही कवने काव्य शाहिरी वचने असेच होते त्यामुळे मराठी भाषेच्या गध्यात्मक विकासाला रानडे फुले आगरकर आणि चिपळूणकर यांच्या प्रयत्न पलीकडे खूप काही गांभीर्याने भाषा ही विचार भाषा करण्यासाठीचे प्रयत्न झाल्याच्या आढळून येत नाही. मराठी भाषा आधुनिकता परंपरा याच्या जोखंडात कायम अडकली आहे. मराठी भाषेला भाषा विकासाचा आधुनिक मार्ग अनुवाद भाषांतर आणि प्रयोग स्वीकार या मार्गाने जाणे म्हणजे साहित्यातील आधुनिक वाद रुजवणे आणि भाषेचा विकास करणे. असे इथल्या साहित्यिकांचे गद्यात्मक लेखन करणाऱ्या बहुसंख्यांक लेखकाचे समज निर्माण झाले आहेत .भाषा विकास हा विचार भाषा तयार करूनच करता येतो हे गृहीत मराठी भाषेत अद्याप स्वीकारले गेलेले नाही. मराठी भाषा भावना भाषा पद्य भाषा कथन भाषा संवाद भाषा वर्णन भाषा आणि गुड कल्पनांच्या रचनेमध्ये अडकलेली भाषा किंबहुना शैली आणि सौष्ठ या रचनेला साहित्य मानणारी मराठी भाषा ही साहित्यिकांनी बंदिस्त केली काय ?असेही म्हणावे लागते.

लेखन म्हणजे विचार भाषा नव्हे पद्य म्हणजे विचार भाषा नव्हे गद्य म्हणजे मराठी साहित्यातील काही अंशी भाग होय गद्याचा विकास हा वांग्मयीन प्रकाराच्या आधारे च केला गेला पाहिजे, पण त्यामध्ये विचाराची सर्व प्राणभुतत्वे असली पाहिजे अभिव्यक्ती अविष्कार आणि विचार स्वातंत्र्य हे ज्या भाषेच्या अंतरंगात पदोपदी आढळत नाही. ती मराठी भाषा आज विचार भाषा होणे असंभव आहे. आजची मराठी भाषा वाङ्मयीन प्रकार मतवादी साहित्य वर्णवादी साहित्य आणि रुढी साहित्य

या अंगाने पुढे चालले आहे, त्यामुळे मराठी साहित्याच्या विचार भाषेचे दारिद्र्य सतत भाषा भगिनींच्या तुलनेने पुढे येत असलेल्या आढळून येते. मराठी भाषा विचार भाषेच्या विकसनाच्या दिशेने पुढे नेण्यासाठी तिला विचार स्वातंत्र्याची किंमत सतत मोजणे महत्त्वाचे वाटत नाही. अविष्कार स्वातंत्र्य निर्भयपणे व्यक्त करण्याच इथे धैर्य दाखवले जात नाही. मुळात विचार स्वातंत्र्य हे सत्य अधिष्ठित अशा आपल्या कृती अनुभवाला शब्दरूप देते. विचार स्वातंत्र्य हे अभिव्यक्तीच्या उत्स्फूर्त ताकतीने पुढे येते. मराठी साहित्यात सांस्कृतिकता, रुढी वाद, सरंजामशाही, वर्णव्यवस्था ,सरंजामी अवशेष या सर्वांना झुगारून विचार साहित्य पुढे येत असलेले दिसून येत नाही. मराठी साहित्यात विचार स्वातंत्र्याचा प्राण अद्याप फुंकलेला आढळून येत नाही, आणि त्यामुळे मराठी भाषा मत भाषा, वर्ग भाषा, संस्कृतिक समर्थन भाषा, आणि छद्वी वांग्मयन प्रकारच्या समर्थनाची भाषा म्हणून पुढे आलेली आहे. गोपाळ गणेश आगरकर यांच्या सुधारकीपरंपरेची विचारभाषा ही मराठीत पुढे सतत सातत्याने सर्व कालखंडात विकसित का झाली नाही? ती करण्यासाठी मराठी भाषेतील कृती साहित्यिकांनी प्रज्ञावंत आणि किती प्रयत्न केले. हा एक फार मोठा संशोधनाचाच विषय आहे .प्रज्ञावंत आणि विचार भाषा हे सर्व कालखंडात एकच असतात प्रज्ञावंतांच्या वर्तनातून विचार भाषा विकसित होते. प्रज्ञा मयता हे रुढीवादी आणि सांस्कृतिक समर्थनवादी असतात त्यांना अविष्कार स्वातंत्र्याची देणे घेणे नसते. निस्पृहता त्यांना महत्त्वाची वाटत नाही .निस्पृहता ,अविष्कार स्वातंत्र्य आणि कृतीवादी जीवन यातूनच विचार भाषा साकारते. या सर्व घटकांचा मराठी भाषिकांच्या जीवनात आभाव आढळून येतो आणि मत स्वातंत्र्यवादी थोडक्यात मतवादी बोरू बहाद्दर हे मराठीचे साहित्य मणी ठरलेले आज पहावयास मिळते.

मराठी साहित्यात बौद्धिक कसरती आणि वैज्ञानिक जादूमुळे प्रयोगांचे मांडणी त्याचबरोबर तर्कशास्त्र ज्योतिष गणित वैद्यकीय शास्त्र अर्थशास्त्र या सर्वांची बेमालुम रचना आढळत नाही, आणि त्यामुळे मराठी साहित्य हे विचारभाषा स्वरूप प्राप्त करू शकत नाही. ही भाषिकांनाही पेशवे उत्तर कालखंडात कळालेले नाही. लोकभाषा, बोलीभाषा, प्रादेशिक भाषा, अभिजात भाषा यांच्या अभिमानामध्ये मराठी भाषिकांना रमण्यामध्ये विचार भाषेचा निर्माण कार्यापासून आपण दूर आहोत. याची जाणीव सुद्धा होत नाही. हे दारिद्र्य मतवादी साहित्याने निर्माण केले आहे. आणि म्हणून भावुक्ता प्रतिक्रिया आणि अनुकरण हा मराठी भाषेच्या भावनिकतेचा कायम दुर्गुण राहिला आहे.

रंजन ता आणि विवेचकता हे मराठी साहित्याला प्रधान साहित्य वाटते. रुढीवादातील अशी रंजकता विविधता पुन्हा पुन्हा वांग्मयीन प्रकारच्या आधारे पुढे आणणे त्यालाच प्रधान साहित्य मानाने असे प्रकार सातत्याने येथे होत असलेले आढळून येतात. त्याची पडताळणी केली जात नाही. इथे वैद्य काय? आणि अवैद्य काय? हे ठरवले जात नाही ठरवणारा वर्ग हाच स्वतःच्या भाषेला विचार भाषा म्हणून प्रमाण ठरवत आला आहे आणि त्यामुळे विवेचकता रंजकता हे मराठी भाषेची कायम विस्तारित अंग क्षेत्र राहिले आहे .ज्ञानाच्या व्यवहारात प्रज्ञावंत सतत उपेक्षित राहिले आहेत .ते दूर फेकले गेले आहेत. प्रज्ञा मयता आणि विवेचकता रंजकता एकत्रित आले आहेत या तिन्ही गुणवैशिष्ट्यांचे साहित्यकार हे साहित्याचे प्रमाण क बनले आहेत.

मराठी साहित्याच्या या प्रवासाची कारणे सामाजिक राष्ट्रीय आंदोलने स्वातंत्र्य चळवळ एकूण सरंजामी व्यवस्थेने टाकलेली कात यामध्ये आढळून येतात. सरंजामशाहीच्या उत्तर कालखंडात ब्रिटिशपूर्व कालखंडाच्या आकर्षण कालखंडात मराठी भाषा अनुकरण आधुनिकता हे सगळे स्वीकारत आपले भाषिक संस्कार सशक्त न करता किंबहुना ती क्षमता नसतानाच या सगळ्या स्थित्यंतराच्या गोष्टी घडत होत्या आणि त्यामुळे मराठी साहित्य पेशवाई उत्तर व ब्रिटिशपूर्व कालखंड आणि स्वातंत्र्य आंदोलन या सर्व कालखंडात कृतीवादीभाषिकांच्या बुद्धी आग्रहातून साकारले गेले.

स्वातंत्र्यपूर्व कालखंड हा मराठी भाषेचा बाल्यावस्थेचा कालखंड मानावा लागतो .मतवादी साहित्यक वर्णन वादी साहित्यिक रंजनवादी साहित्यिक विवेचक साहित्यिक स्वातंत्र्य उत्तर कालखंडात वाढले स्वातंत्र्य आंदोलन कालखंडात कृतीवादी साहित्यिकांचा शब्द बुद्धी भावना यांची एक वाक्यता ही मराठी भाषेला विचार भाषा तयार करण्यास पायाभूत ठरली होती. परंतु हा पाया स्वातंत्र्य उत्तर कालखंडात उघडला गेला सर्व स्वातंत्र्य आंदोलनातील विचारक कृतीवादी आंदोलन करते बुद्धिवादी विज्ञानवादी स्वातंत्र्य सैनिक आंदोलक यांचा अविष्कार स्वातंत्र्यावरचा विश्वास अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी ची त्यांची संघर्ष वृत्ती आणि त्यातून त्यांनी विचार स्वातंत्र्य आणि राजकीय स्वातंत्र्यास च्या साठी मोजलेली सर्व प्रकारची किंमत हा मराठी साहित्याच्या मुख्य व्यवहाराचा विषय तेव्हा बनला पाहिजे होता .तो स्वातंत्र्य उत्तर कालखंडात पूर्णतः दुर्लक्षित उपेक्षित मत स्वातंत्र्यवादी साहित्यिकांनी ठेवला आणि कृतीवादी साहित्यिक स्वातंत्र्य सैनिक यांनी मराठी भाषेला विचार भाषा तयार करण्यासाठीचे चालवलेले प्रयत्न हाणून पाडले. असे दुर्दैवाने नोंद करावे लागते याचे कारण समाजकारण साहित्य वेगळे आहे. साहित्य ही प्रतिभावताची प्रज्ञामायतांची मिरास दारी आहे. असे ठसवण्यात रुजवण्यात हे सगळे यशस्वी झाले .साहित्य व्यवहार त्यांच्या सगळ्या या प्राण शून्य वर्णन साहित्यात बंदिस्त केला गेला होता.

साक्षरतेचा अभाव शिक्षित वर्गाचे अल्प प्रमाण हे पण मराठी भाषेच्या विचार विकास आभावाला कारणीभूत ठरलेल्या आज पर्यंतचे घटक आहे भाषेचा विचार विचाराची भाषा हे मराठी भाषिकांच्या गावी नसलेले भाषिक विचार आहेत. वर्णन करता रंजकता विवेचकता कल्पकता हीच प्रज्ञामयता ता आणि हीच प्रतिभा साहित्यिक मराठी यशस्वी झाले, त्यामुळे मराठी भाषेला विचार भाषेचे आजही पूर्णतः स्वरूप प्राप्त होण्यात अडसर निर्माण झाला आहे .किंबहुना तो दिसून येत आहे

मराठी भाषेच्या प्रादेशिकतेचा द्रविड आणि वैदिकतेच्या संघर्षाचा ही तिच्या विचार भाषेच्या अभावावर परिणाम झाला आहे भागवत संप्रदाय महानुभव साहित्य समर्थ संप्रदाय यांचे साहित्य हा श्रद्धेचा भक्तीचा दीर्घकाळ ७०० वर्षे महाराष्ट्रात हा कालखंड असाच गेल्यामुळे भाषेच्या प्राणंतत्वाला लागणारे सगळे घटक विकसित करण्याची क्षमता श्रद्धेमुळे भक्ति मुळे भाषिकांना प्राप्त झालेली नाही. तसे प्रयत्न करण्याची शक्यताही नव्हती भाषा भावना विचार तर्क अनुमान ऐतिहासिक अन्वेषण आणि भविष्यकालीन अभिव्यक्ती आणि वास्तवाचे अंतिम निष्कर्ष हे भाषेला नोंदवावे लागतात. मराठी भाषा यातील नेमके काय करत होती. तर भावनेच्या तरंगावर प्रादेशिक तेच्या मर्यादा सांभाळत ती पुढे चालली होती श्रद्धा, भक्ती, नामसंकीर्तन, संप्रदायाची रममानता यामध्ये मराठी भाषेने खूप काही गमावले आहे. सांस्कृतिक संचित कमावले हे असे म्हणणारी मराठी भाषा बुद्धी भाषा विचार भाषा ज्ञानभाषा परकीय भाषांच्या तुलनेने कितीतरी ती दूर राहिली आहे. दारिद्र्य तिला प्राप्त तुलनेने झाले आहे.

आपल्या सगळ्या दारिद्र्याची कारणे भाषेच्या दारिद्र्यात असतात ही सुद्धा साक्षरता इथे भाषा सिंहानी अहंकारामुळे रुजवली नाही. कृतीवादी साहित्यिक बुद्धिवाद्यांना सुधारकांना इथल्या मतवादी साहित्यिकांनी अस्पृश्य तुच्छ व भाषा व्याकरणाचे मारेकरी ठरवले आणि या अहंकारातूनच मराठी भाषा सुधारणेचा विचार पुढे नेऊ शकले नाही .मराठी भाषा विचार भाषा स्वरूप प्राप्त करू शकली नाही मराठी भाषा अभिव्यक्तीची स्वतंत्र भाषा बनली नाही मराठी भाषा बुद्धिभाषा बनली आहे मराठी भाषा स्वातंत्र्य चळवळीतील प्रमाणभाषा बनवू शकली नाही. हे सर्व परिणाम मराठी भाषेला केवळ स्वातंत्र्य आंदोलनाला असहकार्य करणाऱ्या वरिष्ठ वर्णीय वर्गीय गटांनी कुटिल राजकारणात अडकवले आणि त्यामुळे हे परिणाम घडले आहेत झाले आहेत. प्राचीनता सोडवत नाही. आधुनिकता स्वीकारण्याचे धैर्य नाही प्रभुत्व जपण्याची काळजी आहे नवी अधिमान्यता तयार करण्याचे धैर्य नाही कुवत नाही अशा लाभवादी ब्रिटिश कालखंडात इथला उच्चवर्णीय वर्ग पुढे जात होता आणि गावगाड्यातील वर्ग हे सर्व उत्कंठेने कळत नसलेल्या अवस्थेत जीवन जगत होता. त्याला हे बदल हे भाषा संक्रमण स्वातंत्र्य संक्रमण व्यवस्था संक्रमण कळत होते. असे अजिबात म्हणता येत नाही. इथे भौतिकता हीच संक्रमणाची गती सर्व कालखंडात पुढे आले आहे. त्यामुळे भाषेचे आंदोलनातील महत्त्व भाषेचे आधुनिकता पुढे नेण्यासाठीचे महत्त्व भाषेतून पुढे आलेला सुधारणावाद हा मराठी भाषिकांच्या गावी पोहोचण्यास कित्येक दशके उशीर झाला असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही. अस्पृश्यता, स्त्री शिक्षण, साक्षरता अंधश्रद्धा, रूढी वाद या सर्व बाबी आजही भारताच्या महाराष्ट्राच्या मुख्य समस्या आहेत. याची कारणे भाषेच्या अंतरंगात विचार भाषेचे चिंतन घटक म्हणून वरील घटक प्रदान ठरले नाहीत. त्या दिशेने भाषिक व्यवहार करतानी ज्ञान व्यवहार पुढे मांडला नाही. नेला नाही. ते साहित्याचे वेदनेचे स्वरूप कथन केले नाही. साहित्यही वेदना असते वेदनेतूनच साहित्य साकारते शब्दरूप घेते वेदना अधिवक्त होते तेव्हा ती अविस्कृत होते .वेदनेची अभिव्यक्ती ही निर्भयतेतूनच होत राहते पण त्यासाठी भाषेची विचारशीलता बौद्धिकता आणि स्वतंत्र निर्भयता ही भाषिकाला प्राप्त होणे. ती समजणे ते वापरण्याचे धाडस प्राप्त होणे हे खूप महत्त्वाचे आहे मराठी भाषेत हे घडले नाही आणि म्हणूनच मराठी भाषा विचार निर्भय भाषा बनली नाही. मराठी भाषा प्रतिक्रिया भय आणि सरंजामी रूढीवादी संकेत सांभाळण्यामध्ये धन्यता पावलेली आहे. हे सर्व संकेत हा देशीवादाचा विस्तार मराठी भाषिकांना खूप महत्त्वाचं वाटतं रुढीवादाचे सर्व संकेत यामध्ये सामाजिकता आहे. असा भ्रम तयार करण्यात देशीवादी यशस्वी झाले त्यामुळे विषमतेचा सगळा विस्तीर्ण जनजीवनाचा भाग आजही आहे तसाच स्वतंत्र स्वायत्त आणि बंदिस्त जगतो आहे.

मराठी भाषेने ७० ते ८० च्या दशकात परिघावरील विषमतेच्या दुःखाचे कड पुढे आणले आत्मकथनातून वैविध्यातून दुःखाचा गहिवर दाखवून दिला आणि साहित्यातील संवेदनशीलता ही सुद्धा बौद्धिक असते हे सुद्धा विचार स्वातंत्र्य असते असा एक भ्रम तयार केला आणि त्या विद्रोही अभिव्यक्तीला आदी मान्यता देऊन बंदिस्त केले थोडक्यात मराठी भाषा ही वेदनेच्या सर्व स्तरांना सर्व कालखंडात बंदिस्त वर्तनकरते .ती गध्यात्मक चिकित्सा, विश्लेषण आणि उपाययोजना करू देत नाही अविष्कार स्वातंत्र्याला बंडखोर आणि विद्रोही ठरवते. ही मराठी भाषेतील साहित्य राज्य करण्याची खोड फार जुनी आणि प्राचीन आहे .मराठी भाषा मत साहित्य ठरावे .मराठी भाषा विचार साहित्य ठरू नये .मराठी साहित्य हे सांस्कृतिक समर्थन साहित्य ठरावे मराठी साहित्य हे रंजन साहित्य ठरावे. मराठी साहित्य विवेचन व वर्णन साहित्य ठरावे यालाच प्रधान साहित्य समजून यामध्ये बहुसंख्यांक भाषिकांनी रमामान व्हावे फसावे .असाही धुर्त प्रयत्न मतसाहित्यिकांनी भावना साहित्य वाद्यांनी वर्ग साहित्य वाद्यांनी चालवला आहे. असे ते मान्य करणार नाहीत. तरीही हे निष्कर्ष हाती येतात.

मराठी साहित्य आणि मराठी भाषा यामध्ये साहित्याचे प्रेम जास्त आणि भाषेची उपेक्षा जास्त हा विसंगत प्रवास भाषिकांचा तब्बल स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये सतत असं चालू आहे. साहित्याचे उत्सव म्हणजे संस्कृती ज्ञान व्यवहार मराठी भाषेला विचाराचे वावडे आहे.

भाषा विचार ही एक अभिवृत्ति व्हायला हवी भाषेचा व्यवहार हा चिंतन व्यवहार व्हायला हवा भाषेचा व्यवहार हा ज्ञान व्यवहार व्हायला हवा आहे. भाषा ही संस्कृतिक संचित असे विश्लेषण व्हायला हवे भाषा हा वैज्ञानिक विचाराचा मार्ग ठरायला हवा आहे. भाषा समाज जीवनाच्या संचित ज्ञानाचा शोध घेणारे साधन ठरायला हवे .तरच मराठी भाषेच्या उज्वल भविष्यकालीन वाटा सुस्पष्ट करण्यामध्ये कृतीवादी साहित्यिकांचे जते पुढे येतील मतवादी साहित्यिक हे बाजूला ठेवणे हे वाचकांना करावे लागेल. आज मतवादी साहित्यिक हेच प्रधान साहित्यिक बनले आहेत आणि त्यामुळे मराठी भाषेतील अभिव्यक्ती विचार स्वातंत्र्य निर्भयता निसृहता ही लोप पावलेली दिसून येते विचार स्वातंत्र्याच्या निर्मितीसाठी भाषिकांचा प्रयास हा कृतीवादी जीवनाच्या सर्व क्षेत्रातून प्रयोगातून पुढे जायला हवा तरच मराठी साहित्यही प्रगल्भ विचार साहित्य आधुनिक साहित्य प्राकृतिक साहित्य म्हणून भाषिकांना समृद्ध करत राहील अन्यथा भाषिकांची भावनिकता भाषिकांची श्रद्धा मय ता आणि भाषिकांचा रुढी वाद मध्ये मराठी भाषा ज्ञानभाषा निर्माण होण्यापासून सतत दूर राहील हे होऊ द्यायचे नसेल तर विचार भाषेतून ज्ञान भाषेकडे जाण्यासाठी कृतीवादी प्रयोगवादी संघर्षवादी मानवतावादी साहित्यिकांचे जथे मराठी साहित्याच्या अग्रस्थानी यायला हवेत अन्यथा मराठी भाषेची कोणती पैजा जिंके अशी अवस्था कायम राहील की काय? अशी खंत वाटून राहते.

**– शिवाजी राऊत, सातारा**

# स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ



**इतिहासा, तू वळूनी मागे पहा, उज्वल इतिहास पाठीमागे जरा, झुकवुनी मस्तक करशील, जिजाऊंना मानाचा मुजरा.**

'नेतृत्व ,कर्तुत्व आणिचारित्र्य ' अशा गुणांनी युक्त स्त्रिया समाजात नेहमीच आदर्श राहिल्या आहेत.त्यापैकीच एक महाराष्ट्राच्या आदर्श राजमाता माँसाहेब जिजाऊ. राजमाता जिजाऊंनी आपल्या कारकीर्दीत दूरदर्शी विचार आणि कार्यातून महाराष्ट्रात शिवरायांमार्फत स्वराज्य रुपी नवीन सृष्टी निर्माण केली. भारताच्या इतिहासात कर्तबगार व लढवय्या वीर महिला म्हणून त्यांचे स्थान उच्च दर्जाचे आहे. दुर्दम्य इच्छाशक्ती आणि स्वराज्याची उर्मी या आधारावर जिजाऊंनी , शहाजीराजांनी पाहिलेले स्वराज्याचे स्वप्न फुलविले आणि शिवरायांना सोबत घेऊन ते पूर्णत्वासदेखील नेले. मोगल, आदिलशाही सत्तेच्या गुलामगिरीत खितपत पडलेल्या रयतेच्या सहाय्याने जन आंदोलन उभा करणाऱ्या आणि प्रचंड साधना, शिक्षण ,संस्कार, मार्गदर्शन आणि प्रेरणेतून शिवरायांसारखा युगपुरुष आणि दूरदर्शी राजा घडवणाऱ्या राजमाता जिजाऊ यांच्या जीवन चरित्रातून आपल्याला फार मोठी प्रेरणा मिळते . बाल शिवरायांना स्वराज्याची प्रेरणा देण्यापासून राज्याभिषेकाचे आयोजन करण्यापर्यंतचा त्यांचा प्रेरणादायी इतिहास आहे.

राजमाता जिजाऊंचा जन्म १२ जानेवारी १५९८रोजी सिंदखेडराजा येथे ऐतिहासिक जाधव यांच्या घराण्यात झाला. माता म्हाळसाबाई तर वडील राजे लखोजीराव जाधव हे होते.लखोजीराजेंनी आपल्या मुलाप्रमाणे जिजाऊंना देखील राजनीति,युद्ध कला यांचे शिक्षण दिले.जिजाऊंनी राजघराण्याचा व्रुथा अभिमान न बाळगता युद्धकला,राजनीति यामध्ये प्राविण्य मिळवले.पुढे बाळ शिवबांच्या डोळस जडणघडणीमध्ये याचा फार उपयोग झाला.


शहाजीराजेंसोबत विवाह झाल्यानंतर शहाजीराजांच्या कार्यात जिजाऊ अत्यंत खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभ्या राहिल्या. आदिलशहा,निजामशहा,मुघल अशा बलाढ्य सत्ताविरोधातअसताना शहाजीराजे व जिजामाता यांनी मोठ्या उदात्त आणि व्यापकपणे रयतेच्या स्थैर्यासाठीस्वराज्य स्थापनेचा निर्णय घेतला.केवळ आपली जहागिरी किंवा वतन याचा विचार न करता प्रजेला न्याय मिळाला पाहिजे ही त्यांची भूमिका होती.जिजाऊंनी पारतंत्र जुगारले, शिवबाच्या ठिकाणी स्वराज्याच्या स्वप्नांची पेरणी केली. त्यासाठी दुर्दम्य इच्छाशक्ती, स्वातंत्र्यकांक्षा, विजयकांक्षा, दृढ आत्मविश्वास,दूरदृष्टी, धाडस, प्रसंगावधानता, स्वाभिमान इत्यादी गुणांची रुजवणूक शिवरायांच्या व्यक्तिमत्वात निर्माण केली.

जिजाऊंचा जन्म विदर्भात,सासर मराठवाड्यात,कार्यकर्तृत्व पश्चिम महाराष्ट्रात,आणि मृत्यू कोकणात असा हा ऐतिहासिक जीवन प्रवास पाहताना त्यांच्या जीवन चरित्रातील चढ-उतार लक्षात येतात. त्यांनी आपल्या जीवनात केवळ आणि केवळ रयतेच्या सुखाचा विचार केला त्यामुळे तानाजी,येसाजी,कान्होजी,जिवाजी,बाजी ,बहिर्जी नाईक,संभाजी कावजी,मुरारबाजी यांसारखे सगळ्या जाती-धर्मातील मावळे स्वराज्यासाठी जीवाची बाजी लावण्यास पुढे झाले.जिजाऊंनी सर्व मावळ्यांनाही आपल्या मायेची ऊब दिली,आणि जिजाऊ अखंड स्वराज्याची सावली झाली.

पुण्याची जहागिरी मिळाल्यानंतर तेथील कारभार पाहण्याची जबाबदारी शहाजीराजांनी जिजाऊंच्या खांद्यावर टाकली.त्यावेळी पुणे नव्याने उभे करणे हे फार मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते.अस्मानी आणि सुलतानी संकटांनी रयत हैराण झालेली होती. सन १६३०मध्ये आदिलशहाचा सरदार मुरार जगदेव ने गाढवाचा नांगर फिरून पुण्याची भूमी अपवित्र केली होती त्यामुळे भीतीने आणि अत्याचाराला कंटाळून रयत पुणे सोडून निघून गेली होती.अशा प्रतिकूल परिस्थितीत जिजाऊंनी बाल शिवाजीच्या हाताने सोन्याचा नांगर फिरवून रयतेत एक नवा विश्वास निर्माण केला.आणि लोकांना पुण्याला परत यायला आवाहन केले.जनतेला बी-बियाणे,बैल जोडी, औत फाटा देऊन प्रोत्साहित केले.आणि ह्याच पुणे आणि आजूबाजूच्या मावळ प्रांतातच जिजाऊंनी शिवराय मार्फत स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली.

आज २१ व्या शतकातही महिलांवर अनेक अन्याय, अत्याचार होताना दिसतात. पण शिवकाळात मासाहेब जिजाऊ महिलांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत जागरूक होत्या.महिलांवर अन्याय अत्याचार करणाऱ्यांचे हातपाय कलम करण्याची शिक्षा त्या सुनावत असत.तेच संस्कार त्यांनी शिवबा वर केले होते.महाराष्ट्र ही तस्वीर पुरुषांची भूमी आहे. तशीच ती वीर मातांची आणि वीर महिलांची देखील भूमी आहे.जिद्द,चिकाटी,धैर्य,करारी ,खंबीर नेतृत्व,नैतिकताअशा असंख्य गुणांची प्रेरणा राजमाता जिजाऊ यांच्या चरित्रातून मिळते.जिजाऊंनी आपल्या कार्यकाळात छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज असे दोन कर्तबगार छत्रपती घडविले.छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर ११

दिवसांनी म्हणजेच १७ जून १६७४रोजी रायगडाच्या पायथ्याला पाचाडया गावी राजमातेने या जगाचा निरोप घेतला आणि एका महान युगाची सांगता झाली.



श्रीमती मनीषा गोराडे - वारुंगसे

उपशिक्षिका, जनता विद्यालय, कोमलवाडी ता. सिन्नर

# रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडच्या प्रदेश सरचिटणीसपदी विष्णूदादा भोसले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : पुरंदर : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीसपदी पुरंदर तालुक्यातील आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते विष्णूदादा भोसले यांची फेर निवड करण्यात आली,



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष डॉ .सतीश केदारी यांनी विष्णूदादा भोसले यांची रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी फेर नियुक्ती करुन त्यांना नियुक्ती पत्र दिले . यावेळी रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे राज्य उपाध्यक्ष सुभाष सहजराव प्रदेश सचिव गोविंद जगताप पुणे शहर अध्यक्ष, किशोर पंडागळे पुरंदर तालुका रिपब्लिकन पक्षाचे माजी अध्यक्ष नामदेव नेटके, बहुजन सामाजिक विकास प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष सुनील जगताप, मुळशी तालुक्याचे नेते नंदू ओव्हाळ आदी मान्यवर उपस्थित होते,

नुकत्याच झालेल्या विधान सभेच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला सन्मानपूर्वक जागा देण्यात आल्या नाहीत , या नाराजीतून विष्णूदादा भोसले यांनी प्रदेश सरचिटणीस पदाचा राजीनामा दिला होता, याबाबत रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडच्या प्रदेश कार्यकारणीची बैठक घेण्यात आली होती, या बैठकीत विधानसभा निवडणुकीत पक्षाला जागा न मिळाल्यामुळे नाराजीतून राजीनामा दिलेल्या पदाधिकारी यांना पुन्हा सक्रिय करुन घेण्याबाबतचा ठराव मिटींगमध्ये मंजूर करुन, याबाबत रिपब्लिकन पक्षाचे सर्वेसर्वा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या बरोबर याबाबत चर्चा केल्यानंतर, विष्णूदादा भोसले यांची प्रदेश रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडच्या सरचिटणीस पदी निवड करण्यात आली असल्याची माहिती रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष डॉ सतिश केदारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली,

विष्णूदादा भोसले यांनी यापूर्वी रिपब्लिकन पक्षाचे तालुकाध्यक्ष , जिल्हा उपाध्यक्ष, श्रमिक ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष, व प्रदेश कार्याध्यक्ष प्रदेश सरचिटणीस पदावर काम केलेले आहे, पून्हा त्यांना प्रदेश सरचिटणीस पदाची जबाबदारी देण्यात आली आहे,

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात मकर संक्रांतीनिमित्त महिला भाविकांच्या दर्शनासाठी सुलभ नियोजन

## पुरुष भाविकांनी मुखदर्शन घ्यावे, मंदिर समितीकडून आवाहन : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पृथ्वीवर्षीप्रमाणे परंपरेनुसार मकर संक्रांत उत्साह साजरा करण्यात येत आहे. मकर संक्रांतीच्या उत्सवानिमित्त भोगीला म्हणजे दिनांक १३ जानेवारी रोजी श्री रुक्मिणी मातेच्या काकडा आरती व नित्य पूजा पहाटे तीन वाजता ते साडेचार वाजता यावेळी करण्यात येणार असून माता भगिनींना श्री रुक्मिणी मातेच्या भोगी करावयाची असेल त्यांनी मंदिरामध्ये पहाटे साडेचार ते साडेपाच च्या वेळेत आरतीच्या दिवशी पहाटे साडेपाच नंतर रुक्मिणी मातेस पोशाख व अलंकार



परिधान करण्यात येतील व सकाळी सहा तीस वाजता दर्शन सुरू करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

. भाविकांच्या सोयीच्या दृष्टीने दिनांक १३ जानेवारी रोजी श्री विठ्ठलाकडील काकड आरती व नित्य पूजा पहाटे साडेचार ते साडेपाच यावेळी होऊन पदपरचे दर्शन पहाटे सहा नंतर सुरू करण्यात येणार आहे दिनांक १४ जानेवारी रोजी नेहमीच्या वेळेमध्ये मकर संक्रांति निमित्त श्री रुक्मिणी मातेच्या काकडा आरती व नित्य पूजा झाल्यानंतर श्री निवृत्ती अलंकार परिधान केल्यानंतर दर्शन सुरू करण्यात येणार आहे तसेच दिनांक १५ जानेवारी रोजी नेहमीप्रमाणे श्री रुक्मिणी मातेची काकड आरती व नित्यपूजा नेहमीच्या वेळेत करण्यात येणार असून दिनांक १४ जानेवारी रोजी मकर संक्रांतीचे निमित्त जास्तीत जास्त माता-भगिनींना श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची दर्शन घेण्यात यावे पुरुष भाविकांना शक्यतो मुखदर्शनाचा लाभ घ्यावा असे आव्हान मंदिर समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

या कालावधीत भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन दर्शन रांग व्यवस्थापन कमांडो नियुक्ती ऑनलाईन दर्शन बुकिंग व्यवस्था बंद चांगली स्वच्छता व्यवस्था आयपी दर्शन निर्बंध पूजेची संख्या कमी करून भाविकांना पुरेसा प्रमाणात सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे सदरचा उत्साह मंदिर समितीचे सहा अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर तसेच सदस्या शकुंतला नडगिरी व अँड माधवीताई निगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडण्यात येत असल्याची व्यवस्थापक मनोज शोत्री यांनी यावेळी सांगितले.

## थोडक्यात...




### अठरा हजारांचा पान मसाला, सुगंधी तंबाखू जप्त; तिघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : अठरा हजार आठशे रुपये किमतीचा पान मसाला व सुगंधी तंबाखू जप्त करून तीन जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी रेणुका रमेश पाटील (सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय दुसरा मजला) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून महांतेश सिद्धाराम गुब्याडकर (वय-४०,रा.शेळगी रोड,भवानी पेठ),यल्लप्पा उर्फ राहुल शाहू सौदागर (रा.शाहीर वस्ती,भवानी पेठ) व सुमित बाबू राठोड (वय-२१-,रा.नेहरूनगर विजापूर रोड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना ८ जानेवारी रोजी दुपारी चार ते सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास कुंभारवेस मड्डी वस्ती येथे घडली.

याबाबत अधिक माहिती अशी की,वरील संशयित आरोपी यांनी त्यांच्या मालकीच्या पान शॉप मधून प्रतिबंधित अन्न पदार्थांचा आर्थिक फायद्यासाठी विक्री हेतू साठा व विक्री करून महाराष्ट्र शासनाच्या वतीने अन्नसुरक्षा आयुक्त अन्न व औषध प्रशासन मुंबई यांनी अधिसूचनानुसार जारी केलेल्या प्रतिक गुटखा व पानमसाला व तसेच सुगंधित तंबाखू इत्यादी उत्पन्न उत्पादन वाहतूक साठा विक्री आदेशाचे भंग केले आहे.व तसेच शिक्षा पात्र कलम ५९ अनुसार शिक्षक शिक्षेस पात्र झाले आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पडसळकर हे करीत आहेत.

# स्वामी दर्शनाने नुतन वर्षाचा आनंद द्विगुणित : डॉ. अमिता बिर्ला



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : आम्ही बिर्ला कुटुंबीय परप्रांतीय असून सुद्धा स्वामींच्या इच्छेनेच.

यंदाच्या नूतन वर्षाच्या पूर्वार्धात येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेण्याचे भाग्य लाभले. नुतन वर्षाच्या पूर्वार्धात स्वामी दर्शनाच्या झालेल्या या लाभाने माझ्यासह संपूर्ण बिर्ला कुटुंबाला आनंद होऊन स्वामी दर्शनाने नूतन वर्षाचा आनंद द्विगुणीत झाला असल्याचे प्रतिपादन राजस्थान मधील कोटा लोकसभा मतदारसंघाचे खासदार तसेच लोकसभेचे विद्यमान अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या सुविद्य पत्नी डॉ.अमिता बिर्ला यांनी केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश इंगळे यांनी डॉ.अमिता बिर्ला व कुटुंब सदस्यांचा स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला.

यावेळी डॉ.अनिता बिर्ला बोलत होत्या. पुढे बोलताना डॉ. अमिता बिर्ला यांनी स्वामी समर्थ नामाच्या प्रचीतीची महिमा ऐकून स्वामीच्या दर्शनाकरिता अक्कलकोटला येण्याची ओढ लागली होती,
पण स्वामी समर्थांच्या इच्छेने या नूतन वर्षात त्यांच्या दर्शनाची ओढ व आतुरता पूर्ण झाली असल्याने जीवन सार्थक झाले असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी मंदिर समितीच्या कार्याचा व स्वामी समर्थांच्या जीवन चरित्राचा प्रथमेश इंगळे यांच्याकडून आवर्जून आढावा घेतला.

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे हिंदू धर्मातील व हिंदू धर्मियांसाठी अत्यंत पवित्र स्थान असून भविष्यात संपूर्ण देशभरातील भाविक स्वामींच्या दर्शनाकरिता अक्कलकोटला नक्कीच भेट देतील असा मनोदय व्यक्त करून मंदिर समितीच्या कार्यास शुभेच्छा व्यक्त केल्या.

याप्रसंगी अक्कलकोटचे तहसीलदार विनायक मगर, उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, कामशेत पुण्यातील पोलीस निरीक्षक सुरेखा शिंदे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, दर्शन घाटगे, तुषार मोरे, धनराज स्वामी, संजय पवार, विपुल जाधव, रवी मलवे, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ, प्रसाद सोनार, गिरीश पवार इत्यादी उपस्थित होते.




# पंढरपूरच्या सामान्य रुग्णालयातील शौचालय कुलूपबंद, रुग्णाची व नातेवाईकांची मोठी गैरसोय; गणेश अंकुशराव आंदोलनाच्या तयारीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूरच्या सामान्य रुग्णालयातील शौचालय कुलूप बंद अवस्थेत असल्याचे येथील रुग्णांना व नातेवाईकांना मोठी गैरसोय होत आहे.

याच्याविरुद्ध आता पंढरीतील महर्षी वाल्मीक संघाचे संस्थापक अध्यक्ष समाजसेवक गणेश अंकुशराव हे आक्रमक झाले असून मोठ्या जन आंदोलनाच्या तयारीत आहेत या संदर्भात गणेश अंकुशराव यांनी एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे अधिक माहिती दिली आहे उपजिल्हा रुग्णालयातील सध्या सेवेत असलेले अधिकारी हे अतिशय बेजबाबदारपणे रुग्णाच्या सोयी सुविधा कडे दुर्लक्ष करत आहेत. पाणी नसल्याचे कारण सांगून रुग्णालयातील सर्व शौचालयांना यांनी टाळे लावल्यास याने रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना विशेषतः महिलांना सुद्धा शौचालय उपलब्ध नसल्याने शक्य चंद्रभागेच्या पात्रात जावे लागत आहे हे अतिशय खेदक जनक व संताप जनक बाब असल्याने आम्ही वारंवार या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन दिली तरीसुद्धा हा प्रश्न सुटला नाही एकीकडे महिला भगिनींच्या सन्मान झाला पाहिजे महिला सशक्त झाल्या पाहिजेत महिला सह सर्वसामान्य जनतेचे त्यांच्या सर्व अधिकार मिळाला हवेत त्यासाठी शासन विविध योजनेद्वारे प्रयत्न करत असताना भाऊ वैकुंठ पंढरीत अशा पद्धतीने महिला भगिनींची सर्वसामान्य रुग्णाची व त्यांच्या नातेवाईकांची मोठी गैरसोय होते रुग्णालयात पाणीच उपलब्ध नसल्याने ऑपरेशन करण्यासाठी सुद्धा अडचणी येत आहेत ही बाब गंभीर असून लाडके बहिणीच्या पाठबळावर सत्तेत आलेली मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनीच आता याकडे लक्ष घालने गरजेचे आहे पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे विद्यमान आमदार समाधान आवताडे व व खासदार प्रणिती ताई शिंदे याकडे लक्ष घालून हा प्रश्न सोडवावा अशी आव्हान केले आहे.

# धोंडप्पा नंदे यांना 'उत्कृष्ट ग्रामीण पत्रकार' पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कुरनूर (ता. अक्कलकोट) - राजमाता जिजाऊ प्रतिष्ठान, कुरनूर तर्फे देण्यात येणारा 'उत्कृष्ट ग्रामीण पत्रकार' पुरस्कार यावर्षी धोंडप्पा नंदे यांना जाहीर झाला आहे. ग्रामीण भागातील समाजजीवन, शेती, शिक्षण, आणि संस्कृतीसाठी केलेल्या त्यांच्या प्रखर पत्रकारितेच्या योगदानाची दखल घेत हा पुरस्कार देण्यात येत आहे.

धोंडप्पा नंदे हे मूळचे अक्कलकोट तालुक्यातील वागदरी या गावचे असून, सध्या पुण्यात स्थायिक आहेत. शहरात राहत असूनही त्यांची पत्रकारिता ग्रामीण भागावर केंद्रित आहे. त्यांनी आजवर निष्कामपणे आणि निष्ठेने पत्रकारितेत काम केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्यासाठी त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जात आहे.

या पुरस्काराची घोषणा राजमाता जिजाऊ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विश्वजीत प्रकाश बिराजदार यांनी केली. पुरस्कार वितरण सोहळा १२ जानेवारी २०२५ रोजी संध्याकाळी सात वाजता, राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सवानिमित्त, कुरनूर येथे आयोजित करण्यात आला आहे. त्यांच्या कार्यामुळे ग्रामीण पत्रकारितेला नवी दिशा मिळाल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# मोहोळ तालुक्यातील विरवडे, हिंगोली, पीरटाकळी, येथे सीना नदीतून अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मोहोळ तालुक्यातील विरवडे हिंगोली, पिरटाकळी येते सीना नदीतून राजरोसपणे बेकायदेशीर वाळूचा स्वरूप आहे, पोलीस महसूल विभागाकडून या ठिकाणी कोणतीही प्रतिबंधात्मक दंडात्मक कारवाई होत नाही, दररोज या ठिकाणाहून यारीने व इतर यंत्राच्या साह्याने २० ते ३० गाड्या वाळूची विक्री होते, अरे महसूल विभागाचे मोठे नुकसान आहे विरवडे, शिंगोली, पेरीटाकळी येतील तलाठी मंडळ अधिकारी हे वाळू उपसा करणाऱ्या कडून हप्ते घेतात, त्यामुळे ते कोणतेही कारवाई करत नाहीत या प्रकरणाची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना देत नाही आम्ही वारंवार याबाबत सविस्तर माहिती मोहोळ तहसीलदार सचिन मुळीक यांना दिलेली आहे, तरीसुद्धा कारवाई करण्यात चालली करत आहेत मिरवडे शिंगोली पीरटाकळी व मिर्या ठिकाणहून राहुल भंडारे दिलीप अवताडे अशपाक पटेल सलगरे नावाची व्यक्ती दररोज वाळू काढून विकत आहे तरी आपणास विनंती आहे की सेना नदीत ऊन बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्या वर संबंधित ठिकाणाची पाहणी करून तात्काळ पंचनामे करून दंडात्मक पर्यावरण कायद्यानुसार फौजदारी कारवाई करून सर्व यंत्रसामग्रीक जप्त करण्यात यावी तसेच येथील अकार्यक्षम तलाठी व मंडलाधिकारी यांची बदली करण्यात यावी अशी तक्रार जनतेतून भोसरी गणेश मोरे यांनी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांना मोहोळ तहसीलदार मुळक यांच्याकडे केले आहे.

# वेरना हॉटेल जवळ अपघात; अज्ञात चालकावर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : वेरना हॉटेल जवळ झालेल्या अपघात प्रकरणी अज्ञात चालकविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
ही घटना ६ जानेवारी रोजी रात्री सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी सातप्पा मल्लिकार्जुन कोटे (वय-३७,रा. मु.पोस्ट नंदुर, डोणगाव. ता. उत्तर सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी व त्यांची आई निलाबाई असे मिळून दुचाकी क्रमांक एम.एच.१३.बीके.०२८८ वरून नंदुर येथील घराकडे जात असताना मागून येणाऱ्या चार चाकी वाहनाने फिर्यादी व फिर्यादी यांच्या आईस धडक देऊन किरकोळ व गंभीर दुखापत करण्यास कारणीभूत झाला आहे. तसेच वाहन न थांबवता व विचारपूस न करता पळून गेला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.

पुढील तपास पोलीस हवालदार राठोड हे करीत आहेत.

## स्वेरीमध्ये 'नॅशनल एनर्जी कंझर्वेशन विक' साजरा

## वापरणाऱ्या विद्युत उपकरणांची संख्या कमी करावे म्हणजे विजेची होईल बचत

# विजेची बचत करणे ही काळाची गरज : मॅनेजमेंट कन्सल्टंट मा. सुनील दोशी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : 'विजेची बचत करणे ही सध्या काळाची गरज बनली आहे. मागणीपेक्षा विजेचा पुरवठा कमी असल्यामुळे नागरिकांना भारनियमनाचा सामना करावा लागत आहे. परंतु, प्रत्येकाने जर घरामध्ये विजेचा वापर करताना काळजी घेतली तर भविष्यात भरपूर विजेची बचत होऊ शकते. घरातील सर्वच सदस्यांनी वीज बचतीसाठी पुढाकार घेतला तर वीज बचत होईलच, शिवाय येणारे विजबील देखील कमी येईल. 'राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन' आपल्याला ऊर्जा काळजीपूर्वक वापरण्याचा आणि भावी पिढ्यांसाठी शाश्वत भविष्य घडवण्याची




**स्वेरीमध्ये 'नॅशनल एनर्जी कंझर्वेशन विक' साजरा करण्यात आला, यावेळी उपस्थित मान्यवर.**

सामूहिक जबाबदारी लक्षात आणून देतो. यासाठी उर्जा बचत करणे ही काळाची गरज आहे.' असे प्रतिपादन पुण्यातील मॅनेजमेंट कन्सल्टंट मा. सुनील दोशी यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचालित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग व आय.आय.सी. तथा 'इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल' यांच्या संयुक्त विद्यमाने व 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स इंडिया' आय.ई.आय., सोलापूर लोकल सेंटरच्या सहकार्याने दि.१४ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२४ दरम्यान 'नॅशनल एनर्जी कंझर्वेशन विक (राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताह) साजरा करण्यात आला. या प्रसंगी 'पॉवरिंग द फ्युचर: द रोल ऑफ एनर्जी कंजर्वेशन टुडे' या विषयावर भविष्यात उर्जेची बचत कशी करता येईल यावर पुण्यातील मॅनेजमेंट कन्सल्टंट मा. सुनील दोशी हे बहुमोल मार्गदर्शन करत होते. संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. दिपप्रज्वलनानंतर इन्फ्रास्ट्रक्चर अधिष्ठाता व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. डी.ए. तंबोळी यांनी प्रास्ताविकात या उर्जा बचत सप्ताहाचे महत्व स्पष्ट केले व कार्यक्रमाची रूपरेषा सांगीतली. उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार म्हणाल्या कि, 'शाश्वत भविष्यासाठी विजेची बचत करणे आवश्यक आहे. विजेची बचत करण्याची सुरवात आपल्यापासून व्हावी. अकारण ट्यूब, बल्ब, पंखे लावू नयेत. ज्या ठिकाणी कोणीही नाहीत अशा ठिकाणी विजेवरील उपकरणे चालू असतील तर ती त्वरित बंद करावीत.' असे सांगून भविष्यात विजेच्या वापराबाबत गंभीरता आवश्यक आहे हे स्पष्ट केले. यावेळी पाहुण्यांनी विजेची बचत, अकारण वाया जाणारी वीज कशी वाचवता येईल यावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानावरून बोलताना संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे म्हणाले की, 'विजेची बचत करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे तुम्ही वापरत असलेल्या विद्युत उपकरणांची संख्या कमी करणे, जास्त क्षमतेच्या उपकरणा ऐवजी कमी क्षमतेची व उत्तम दर्जाची उपकरणे वापरावी. यामुळे वीज बचत होऊ शकते.' यासाठी डॉ. बादलकुमार यांनी सर्व कर्मचारी सदस्यांना 'ऊर्जा संवर्धना'साठी शपथ दिली. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये वीज बचतीची व संवर्धनाची जनजागृती व्हावी यासाठी 'पोस्टर प्रेझेंटेशन' हा स्पर्धात्मक उपक्रम राबवण्यात आला. यासाठी विद्यार्थ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला. यावेळी स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग चे डॉ.पी. आर. कुलकर्णी, प्रशासन अधिष्ठाता डॉ.एम.पी.ठाकरे, आय.आय.सी.चे प्रेसिडेंट प्रा.दिग्विजय रोंगे, डॉ. बादलकुमार यांच्यासह इतर प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. आर. एल. खांडेभराड यांनी करून सर्वांचे आभार मानले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

रविवार दि. १२ जानेवारी २०२५ 

## थोडक्यात...

### लक्ष विचलित करून वीस हजाराची रक्कम पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : तरुणाचे लक्ष विचलित करून २० हजाराची रक्कम चोरून नेल्याची घटना ८ जानेवारी रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास एमएसईडीएल एमआयडीसी सेक्शन ऑफिस एमएसईबी ऑफीस शेजारी एमआयडीसी रोड येथे घडली. याप्रकरणी श्रीकांत राजेश खुनी (वय-२०-,रा.राजरत्न नगर,नीलम नगर,एमआयडीसी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी हे विज बिल व टेलिफोन भरणा करत असताना अचानक एक अज्ञात इसम फिर्यादी यांच्या केबिनमध्ये आला व सुट्टे पैसे पाहिजे अशी विचारणा केली. त्यावेळी फिर्यादी यांनी पन्नास रुपये रकमेचे सुट्टे पैसे दिले.त्यानंतर तो इसम थोड्यावेळ बाहेर थांबला व परत फिर्यादी जवळ आला.फिर्यादी हे काउंटर वरती विज बिल भरणा करून घेत असताना त्या इसमाने फिर्यादी यांचे लक्ष विचलित करून काउंटरमध्ये जमा झालेली पाचशे रुपये नोटांचा बंडल असलेली एकूण वीस हजार रुपयांची रक्कम चोरून नेली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पाटील हे करीत आहेत.

# अवैध वाळू वाहतूकीवर महसूल प्रशासनाची कारवाई : तहसिलदार सचिन लंगुटे

## एक जेसीबी, एक टिपर तसेच अशोक लेलँड कंपनीचा टेम्पो जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. महसूल पथकाने भीमा नदीपात्रात अवैध वाळू उपसा व वाहतूकीसाठी वापरण्यात येणारे एक जेसीबी, एक टिपर तसेच अशोक लेलँड कंपनीचा टेम्पो जप्त करण्यात आले असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.







पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. चंद्रभागा नदी पात्रात जुन्या दगडी पुलाजवळ अवैध वाळू उत्खनन करून वाहतूक करणारा अशोक लेलँड कंपनीच्या टेम्पो तसेच मौजे गुरसाळे (ता. पंढरपूर) येथील भीमा नदी पात्रालगत एक जेसीबी व एक टिपर अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करण्यात येत असल्याची माहिती महसूल प्रशासनास मिळाली. सदरच्या दोन्ही कारवाई महसूल पथकाने पहाटे ५.०० ते सकाळी ८.०० वाजताच्या दरम्यान केली. सदर कारवाई मधील वाहने शासकीय धान्य गोदाम येथे जमा करण्यात आली आहेत.

या दोन्ही कारवाईमध्ये मंडळ अधिकारी विजय शिवशरण, बाळासाहेब कदम, राजेंद्र वाघमारे ग्राम महसूल अधिकारी प्रमोद खंडागळे , महेशकुमार सावंत, गणेश पिसे, संजय खंडागळे रविकिरण लोखंडे , पि पि कोईगडे ,आर बी खंदारे ,राहुल गुटाळ व पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन चे पोलीस हवलदार हनुमंत शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल आवटे, सूर्यवंशी व पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी सहभागी होते.

# राकेश जानराव यांना अर्थशास्त्र विषयात पीएचडी प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



धाराशिव : सुधाकर रणदिवे, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ कळंब आगारात कार्यरत असणारे सहाय्यक वाहतूक अधिक्षक राकेश रोहिदास जानराव यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची विधावाचस्पती अर्थात पीएचडी देवून सन्मानीत करण्यात आले आहे.

राकेश जानराव हे पांगरी ता. बार्शी जि सोलापूर येथील रहिवासी असून सध्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात सहाय्यक वाहतूक अधिक्षक म्हणून कळंब आगार धाराशिव या ठिकाणी कार्यरत आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा २० वा दीक्षांत समारंभात महाराष्ट्राचे महामहिम राज्यपाल तथा कुलपती सी.पी.राधाकृष्णन ,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरचे कुलगुरू प्रा.डॉ. प्रकाश महानवर,इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबई चे कुलपती प्रा .जे.बी. जोशी या मान्यवराच्या हस्ते अर्थशास्त्र या विषयाची उच्च पदवी विधावाचस्पती अर्थात पीएचडी पदवी देवुन सन्मानीत करण्यात आले आहे.

राकेश जानराव यांनी अर्थशास्त्र विषयात रोल ऑफ इलेक्ट्रिसिटी इन एग्रीकल्चर डेव्हलपमेंट विथ रेफरन्स टु सोलापूर डिस्ट्रिक्ट यावर संशोधन कार्य वालचंद महाविद्यालय सोलापूर अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. संग्राम चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली पुर्ण करून प्रबंध पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथे सादर केला होता. श्री. राकेश जानराव यांचे डॉ. गौतम कांबळे संचालक सामाजिक शास्त्र संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर, वालचंद महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कोटी ,डॉ. संतोष कदम (मंद्रुप),डॉ. पांडुरंग शिंदे (कुर्डुवाडी), प्रा.प्रमोद शहा (कुर्डुवाडी),प्रा. डॉ. शहाजी चंदनशिवे (परंडा),डॉ. दिपाली पाटील, प्रा.डॉ. मारूती लोंढे, विजय बांगर , विभाग नियंत्रक धाराशिव भालेराव, विभाग नियञंक लातूर अश्वजित जानराव, सुरक्षा व दृष्शता अधिकारी श्रीधर नेहरकर,डॉ. वैभव राउत ,माजी.मुख्याध्यापक श्रीमंत रणदिवे, प्रा उमेश रणदिवे, पत्रकार सुधाकर रणदिवे, संपादक विकास गायकवाड (उमरगा )श्रीकर जकाते, आंनद आदमाने, तात्या बोधे,अरून नारकर पांगरी, कुलदीप सांवत सर, बाळासाहेब जानराव, विजय बनसोडे, काकासाहेब लगाडे, यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या, त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# हरवलेल्या मुलाच्या पालकांनी संपर्क साधण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : श्री विठ्ठल मंदिर परिसर, पंढरपूर जि सोलापूर येथून अथर्व निलेशराव देशमुख वय अंदाजे ८ वर्ष विनापालक आढळले आहे. सदर बालकाच्या आई वडिलांनी अथवा त्याच्या इतर नातेवाईकांनी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी किंवा बाल कल्याण समिती, सोलापूर, अथवा जिल्हा परिविक्षा अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे बालगृह / निरीक्षणगृह, (रिमांड होम) सोलापूर यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.



सदर बालकास काळजी व संरक्षणासाठी बाल कल्याण समिती, सोलापूर यांच्या आदेशाने जिल्हा परिविक्षा अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे बालगृह / निरीक्षणगृह, (रिमांड होम) सोलापूर येथे दाखल केले असून, बालकाच्या आई वडिलांनी अथवा त्याच्या इतर नातेवाईकांनी ही माहिती प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत जिल्हा बाल संरक्षण अधिकारी (श्रीमती गायकवाड रेश्मा संपर्क क्रमांक ९४२०४४७३२९) किंवा बाल कल्याण समिती, सोलापूर, अथवा जिल्हा परिविक्षा अनुरक्षण संघटना संचलित मुलांचे बालगृह / निरीक्षणगृह, (रिमांड होम) सोलापूर यांचेशी संपर्क साधावा असेही जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सोलापूर कळविले आहे.

# मेरा खुर्द येथिल शेतकऱ्याच्या तुरीचे कट्टे चोरीला, अज्ञात चोरट्याचा शोध सुरू

## अवघ्या काही तासात लावला पोलिसांनी चोरीला गेलेला मालाचा छडा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे/चिखली तालुका प्रतिनिधी

चिखली तालुक्यातील मेरा खुर्द सह परिसरात सध्या तुर मळणी यंत्राच्या साह्याने काढण्याचे सिझन सुरू असून,तूर सोंगणी व काढणीचे कामे सुरू आहेत. त्यातच मेरा खुर्द येथील शेतकरी संदीप कडूबा काळे यांच्या गट नंबर २४७ मधिल शेतामध्ये काल दिनांक ९ जानेवारी रोजी त्यांनी आपल्या शेतातील तूर काढून रात्रीची वेळ झाल्यामुळे कट्टे शेतामध्ये भरून ठेवले होते व काही तूर शेतात थपडावर वाळण्यासाठी ठेवली.परंतु तूर भरलेले पाच कट्टे अज्ञात आरोपीने चोरण्याचा प्रयत्न करून ते उचलून गट नंबर २५३ मध्ये चार कट्टे व एक कट्टा शेजारील शेतात आणून टाकला.सदर चोरीची माहिती शेतकरी संदीप काळे यांनी अंढेरा पोलिस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील यांना कळवताच,ठाणेदारांनी मेरा खुर्द येथे भेट दिली व सीसीटीव्ही कुठे आहे काय त्याची तपासणी केली. तसेच मेरा खुर्दचे बीट जमादार कैलास उगले व रायटर जाधव यांनी येऊन पाहिले असता,सदर तूर ही अंत्री खेडेकरच्या रस्त्याने त्यांना सांडलेली दिसली.त्यांनी सांडलेल्या तुरीचा माग काढला असता,मेरा खुर्द साखरखेर्डा रोड लगत असलेल्या गट नंबर २५३ मध्ये ऊसाच्या शेतामध्ये पोलिसांना चार कट्टे तुरीचे आढळून आले.याबाबत त्यांनी संदीप काळे यांना संपर्क करून हे तुरीचे कट्टे तुमचे आहे का,असे विचारले असता,संदीप काळे यांनी सांगितले की,ही तूर माझ्या शेतातील आहे.चोरीला गेलेल्या शेतमालाचा काही तासांमध्येच छडा लावल्याने शेतकऱ्याकडून आनंद व्यक्त करण्यात आला.या घटनेचा पुढील तपास अंढेरा पोलिस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार कैलास उगले व जाधव हे करीत आहेत.

# बाबा ग्रुप फाऊंडेशनने चौथ्या वर्धापन दिनानिमित्त आरोग्य शिबिर राबवून जपली सामाजिक बांधिलकी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/ मिलिंद जाधव



नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत बाबा ग्रुप फाऊंडेशनच्या चौथ्या वर्धापदिनानिमित्त ५ जानेवारी २०२५ रोजी भिवंडी तालुक्यातील लोनाड येथे आरोग्य तपासणी शिबिर घेऊन बाबा ग्रुप फाऊंडेशनने सामाजिक बांधिलकी जपली आहे. सदर आरोग्य शिबिरात एक्स-रे, चष्मे, मेडिसिन, बाबा ग्रुप फाउंडेशनच्या तर्फे मोफत देण्यात आले असून २२५ नागरिकांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला.

यावेळी उपस्थित पाहुण्यांनी बाबा ग्रुप फाउंडेशनच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या. एपेक्स हॉस्पिटल्स मुलुंड ,ए. एस. जी नेत्र रुग्णालय कल्याण यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रम यशस्वी कण्यासाठी बाबा ग्रुप फाऊंडेशन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अनिकेत जाधव, उपाध्यक्ष सागर गायकवाड, सचिव अनिकेत दोंदे, खजिनदार हरेश जाधव, सदस्य विकास धनगर, जाधव, अजय जाधव, प्रवेश खलिफा, ऋतिक जाधव, साज खलिफा, आदित्य जाधव, निलेश कुंभार यांनी मेहनत घेतली.

**गोमाता संरक्षण, महिला सन्मान आणि समाजसुधारणेवर विचारमंथन**

**पुरस्कारामुळे डॉ. विश्वासराव आरोटे यांचा सत्कार**

# शंकरजी गायकर आणि डॉ. विश्वासराव आरोटे यांची महत्त्वपूर्ण भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ब्राम्हणवाडा, प्रतिनिधी (अकोले तालुका) :

आज ब्राम्हणवाडा गावाने एक ऐतिहासिक क्षण अनुभवला. विश्व हिंदू परिषद केंद्रीय सह मंत्री आणि राष्ट्रीय प्रवक्ता माननीय श्री. शंकरजी गायकर साहेब आपल्या गावी ब्राम्हणवाडा येथे आले होते यावेळी त्यांनी महाराष्ट्र राज्य सरचिटणीस आणि दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याशी महत्त्वपूर्ण चर्चा केली.




डॉ. विश्वासराव आरोटे यांना नुकताच पत्रकार भूषण पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला होता. याबद्दल मा. शंकरजी गायकर साहेब यांनी त्यांचा सत्कार करत त्यांचे अभिनंदन केले. या भेटीमुळे समाजाच्या विकासासाठी पुढील दिशा आखण्यासाठी महत्त्वाचे विचारमंथन घडले.

**गोमातेच्या संवर्धनावर विशेष चर्चा**

शंकरजी गायकर साहेबांनी गोमातेच्या महत्त्वावर सखोल विचार मांडले. ते म्हणाले, गोमाता ही केवळ आपली संस्कृतीच नव्हे, तर आपल्या कृषीप्रधान देशाचा आत्माही आहे. गोमातेचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे. तिचे पालन-पोषण फक्त दुधासाठी न करता, संपूर्ण जबाबदारीने केले पाहिजे.

गोमातेच्या संरक्षणासाठी प्रयत्न,

गायकर साहेबांनी त्यांच्या संघर्षाची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, २०१५ मध्ये मोदी सरकारच्या काळात गोहत्या बंदीचा कायदा लागू झाला. यासाठी आम्ही अनेक आंदोलनं केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात नागपूर अधिवेशनात गोसेवा आयोग स्थापन करण्यासाठी आम्ही प्रखर आंदोलन केले.

त्यांनी असेही नमूद केले की, गोमाते पुढे कोणतेही सरकार असो, आम्ही गोमातेच्या संरक्षणासाठी सदैव झटत राहू. हिंदुस्तान कृषीप्रधान देश आहे आणि गोमाता ही त्या देशाच्या भरभराटीचा आधार आहे. प्रत्येक शेतकऱ्याने गावठी गायींचे पालन केले पाहिजे. गायींना जंगलात सोडून न देता, त्यांचे योग्य पालन करून शेतकरी आपले जीवन अधिक समृद्ध करू शकतो.

**हिंदू परंपरा आणि गोमातेचे स्थान**

गायकर साहेबांनी हिंदू धर्मामध्ये गोमातेचे असलेले महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, पूर्वीच्या काळात मुलीच्या लग्नात गोदान करण्याची प्रथा होती. याचा अर्थ गोमातेच्या माध्यमातून मुलीला तिच्या आईच्या मायेचा अनुभव मिळावा, असा होता. गोमाता ही आपल्या कुटुंबाचा आणि संस्कृतीचा महत्त्वाचा भाग आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत हिंदू धर्मात गोमातेचे स्थान अबाधित आहे.

**महिलांच्या सन्मानासाठी आवाहन**

गायकर साहेबांनी महिला सन्मान आणि समानतेचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, आपल्या समाजात महिलांना माता-भगिनी म्हणून मानाचे स्थान मिळाले पाहिजे. विधवा, परित्यक्ता, सौभाग्यवती यामध्ये कोणताही भेदभाव करता कामा नये.

त्यांनी एक महत्त्वाचे उदाहरण दिले की, मी एका कार्यक्रमात हिंदू आणि मुस्लिम महिलांचे एकत्र पूजन केले होते. यामुळे समाजातील समरसता टिकवण्यासाठी मोठा संदेश जातो.

**स्त्री सन्मानासाठी प्रेरणा**

त्यांनी राणी तारामती यांचे उदाहरण देत सांगितले की, स्त्रिया आपल्या कुटुंबाचा आणि समाजाचा आधारस्तंभ आहेत. त्यामुळे त्यांच्या सन्मानासाठी प्रत्येकाने जागरूक राहिले पाहिजे. सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये महिलांना प्राधान्य दिले पाहिजे.

**भेटीचे परिणाम आणि चर्चा विषय**

या भेटीदरम्यान गोमाता संरक्षण, कृषी सुधारणा, हिंदू संस्कृती, आणि समाजातील स्त्रियांच्या सन्मानासाठी अनेक उपाययोजना सुचवण्यात आल्या. शंकरजी गायकर साहेबांनी गोमातेच्या कायद्याचे महत्त्व पटवून दिले आणि यासाठी सरकारवर कसा दबाव आणावा, यावर मार्गदर्शन केले.

डॉ. विश्वासराव आरोटे यांनीही पत्रकारितेच्या माध्यमातून समाज प्रबोधनासाठी योगदान देण्याचे वचन दिले. त्यांनी सांगितले, गोमाता संरक्षण, समाज सुधारणा, आणि महिला सन्मान यांसाठी आपण नेहमी तत्पर राहू..

ब्राम्हणवाडा गावात झालेली ही भेट सामाजिक, सांस्कृतिक, आणि धार्मिक एकात्मतेचा संदेश देणारी ठरली. गोमातेच्या संवर्धनासाठी, महिलांच्या सन्मानासाठी, आणि समाजाच्या विकासासाठी ही भेट प्रेरणादायी ठरली आहे.